**ठळक बातम्या**

- देश आठ टक्के वेगानं प्रगती करीत असून सरकार प्रत्येक क्षेत्रावर लक्ष देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- सरकार साडे चार टक्के वित्तीय तुटीचं लक्ष्य गाठण्यासाठी प्रयत्नशील असल्याची अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची लोकसभेत ग्वाही
- आरक्षणाच्या प्रश्नावर सर्व समाजाच्या नेत्यांशी चर्चा करुन सर्वमान्य तोडगा काढण्याची माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मागणी
- ५६व्या रसायनशास्त्र ऑलिंपियाडमधे भारतीय विद्यार्थ्यांनी पटकावली ४ पदकं / महाराष्ट्रातल्या तिघांचा समावेश
- केरळमधे वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे दरड कोसळून ९३ जणांचा मृत्यू, १२८ जण जखमी

  **आणि**

- पॅरिस ऑलिंपिकमधे, नेमबाजीत मनु भाकर आणि सरबजोत सिंग यांना १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात मिश्र दुहेरीचं कांस्य पदक / बॅडमिंटन पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><><>**

देश आठ टक्के वेगानं प्रगती करीत असून अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रावर यंदाच्या अर्थसंकल्पात लक्ष दिलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडीयन इंडस्ट्रीज या उद्योजक संघटनेनं आज नवी दिल्लीत आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या चर्चासत्राचा विषय आहे, विकसित

भारताच्या दिशेने वाटचाल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह अनेक मान्यवर या परिषदेला उपस्थित होते.

भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनेल आणि प्रधानमंत्री गतीशक्ती योजनेचा यात मोठा वाटा असेल, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी या परिषदेत बोलताना सांगितलं. भारत ३० ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचा टप्पा सहज पार करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

सरकार साडे चार टक्के वित्तीय तुटीचं लक्ष्य गाठण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर दिलं. भारत ही कोविडनंतर वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचं त्या म्हणाल्या. २०२३-२४ आर्थिक वर्षासाठी सरकारी खर्चात झपाट्यानं वाढ झाली असून तो ४८ लाख २१ कोटी रुपये आहे यावर त्यांनी भर दिला. कृषी आणि संलग्न क्षेत्र, ग्रामीण विकास, शहरी विकास, आरोग्य आणि समाजकल्याण यासारख्या क्षेत्रांसाठी अर्थसंकल्पातल्या तरतूदीत वाढ झाली असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. तरुणांसाठी या अर्थसंकल्पात ५ नवीन योजनांचा समावेश केला असल्याचं त्यांनी सांगितलं. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अहवालानुसार गेल्या १० वर्षांत १२ कोटी ५ लाख रोजगारांची निर्मिती झाली असल्याचं त्या म्हणाल्या.

हा अर्थसंकल्प देशाला सर्वसमावेशक विकासाकडे घेऊन जाणारा असल्याचं भाजपाचे देवेंद्र सिंह म्हणाले. यंदाचा अर्थसंकल्प बेरोजगारी आणि ग्रामीण भागाच्या विकासाबाबत मौन बाळगणारा असल्याची टीका समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी केली.

**<><><><><>**

राज्यसभेत आजही अर्थसंकल्पावरची चर्चा झाली. यावेळी बोलताना राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल यांनी २०१४ पासून सरकारने आर्थिक शिस्तीचा अवलंब करुन देशाची आर्थिक स्थिती सुधारल्याचं प्रतिपादन केलं. गेल्या दहा वर्षांत देशात रस्ते, पूल, विमानतळ, बंदरं आणि नूतनीकरणक्षम उर्जा यांचं जाळं निर्माण झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कृषि पायाभूत सुविधा निधी अंतर्गत देशभरात ७६ हजार कोटी रुपयांचे ७२ हजार पायाभूत सुविधा प्रकल्प उभारण्यात आल्याचं केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. लोकसभेत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली. काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी शून्य काळात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेत, त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान देण्याची मागणी केली.

**<><><><><>**

नाले सफाईचं संपूर्ण यांत्रिकीकरण आणि मनुष्याद्वारे मैला वाहून नेण्याची पद्धत बंद करण्यासाठी सध्या कोणतही विधेयक प्रस्तावित नसल्याचं सरकारनं म्हटलं आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी लोकसभेत लेखी प्रश्नाला उत्तर देताना ही माहिती दिली.

**<><><><><>**

आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्व समाजाच्या नेत्यांना बोलावून चर्चा करावी आणि सर्वमान्य तोडगा काढावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. आरक्षणाचा प्रश्न लोकसभेतच सुटू शकतो, हे अधिकार राज्यांना नाहीत, असं ते म्हणाले. केंद्र सरकार आरक्षणाची मर्यादा वाढवण्यासंदर्भात तोडगा काढत असेल तर आमच्या पक्षाचा पाठिंबा असेल, असं त्यांनी सांगितलं. मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे ही आमची भूमिका आहे, असं ते म्हणाले.

धारावीतल्या रहिवाशांना धारावीतच घर मिळायला हवं अशी आमची मागणी असून धारावीवासियांना बेघर होऊ देणार नाही, असंही उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितलं. राज्य सरकारनं पशुसंवर्धन खात्याचा भूखंड मुंबै बँकेला दिला असून महाविकास आघाडीचं सरकार आलं तर हा निर्णय रद्द करु, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या सर्व राज्यांच्या राज्यपालांची परिषद येत्या २ आणि ३ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. नुकतेच लागू झालेल्या फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी, उच्च शिक्षणात सुधारणा आणि विद्यापीठांची मान्यता, आदिवासी क्षेत्र तसंच आकांक्षित जिल्हे आणि तालुक्यातल्या विकासकामांमधे राज्यपालांची भूमिका या विषयाच्या अनुषंगाने या परिषदेत चर्चा होईल.

<><><><><>

५६व्या रसायनशास्त्र ऑलिंपियाडमधे भारतीय विद्यार्थ्यांनी ४ पदकं मिळवली असून त्यात ३ महाराष्ट्रातले आहेत. जळगावच्या देवेश पंकज भैया या विद्यार्थ्यानं सुवर्ण पदक मिळवलं. मुंबईतल्या अवनीश बन्सलनं रौप्यपदक तर कश्यप खंडेलवालने कांस्य पदक मिळवलं. याखेरीज हैद्राबादच्या हर्षिन पोसीनाला रौप्य पदक मिळालं. सौदी अरेबियामधे रियाध इथं झालेल्या या स्पर्धेत ९४ देशांमधले मिळून ३२७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

<><><><><>

केरळच्या वायनाड जिल्ह्यातल्या मुंडक्काई, अट्टामाला आणि चूरमाला या भागात मुसळधार पावसामुळे आज भूस्खलन झाल्यानं ९३ जणांचा मृत्यू झाला तर १२८ हून अधिक जण जखमी झाले. जखमींवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भूस्खलन झालेल्या भागात एनडीआरएफचं पथक, लष्कर तसंच नौदलाचे जवान बचावकार्य करत आहेत. मुंडक्काईच्या डोंगराळ भागातून १५० नागरिकांना वाचवण्यात आलं आहे.

चूरमाला इथं नदीवरचा पूल वाहून गेल्यानं दोरीच्या साहाय्यानं अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यात आली. मेप्पडी इथं मदत केंद्र उभारण्यात आलं आहे. दरम्यान, केरळच्या अनेक जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांना पर्यटन स्थळांवर न जाण्याचं आवाहन केलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही समाज माध्यमावरच्या संदेशातून शोक व्यक्त केला तसंच जखमींच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी कामना केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेविषयी शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपयांची तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी केरळमध्ये दोन दिवसांचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे.

मृतांपैकी ३४ जणांची ओळख पटली असून १८ मृतदेह कुटुंबांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. वायनाडमध्ये ४५ मदत केंद्र सुरू करण्यात आली असून त्या ३ हजार ६९ नागरिकांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**<><><><><>**

हावडा - मुंबई एक्सप्रेसला झारखंड इथं झालेल्या अपघातात दोन प्रवाशांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. इथलं बचावकार्य पूर्ण झालं असून जखमींना रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं आहे. मृतांच्या कुटुंबांना दहा लाख रुपये, गंभीर जखमींना पाच लाख आणि जखमी प्रवाशांना एक लाख रुपये मदत रेल्वेने जाहीर केली आहे. या अपघातामुळे दक्षिण पूर्व रेल्वेच्या टाटानगर - चक्रधरपूर विभागाची रेल्वे वाहतूक विस्कळित झाली. तसंच लांब पल्ल्याच्या अकरा गाड्या रद्द करण्यात आल्या, तर १७ गाड्या दुसऱ्या मार्गानं वळवण्यात आल्या.

रेल्वेनं अनेक मदत क्रमांक जाहीर केले आहेत. मुंबईसाठी ०२२-२२-६९-४०-४० या क्रमांकावर संपर्क करण्याचं आवाहन केलं आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३० जुलै २०२४ -मंगळवार

<><><><><>

पॅरिस ऑलिंपिक मध्ये भारतीय नेमबाज मनु भाकर आणि सरबजोत सिंग या जोडीनं पॅरिस ऑलिपिंकमधे १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात मिश्र दुहेरी गटातं कांस्य पदक पटकावलं आहे. स्वातंत्र्योत्तर काळात एकाच क्रीडा प्रकारात एकाच ऑलिंपिकमधे दोन पदकं मिळवणारी मनु भाकर ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. सरबजोत सिंग याने त्याचं पहिलं ऑलिंपिक पदक पटकावलं आहे.

भारताच्या हॉकी संघाने आयर्लंडवर २-० अशी मात करत पुढच्या फेरीत प्रवेश केला. बॅडमिंटन पुरुष दुहेरी मध्ये भारताच्या सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. भारतीय टेबलटेनिसपटू मनिका बात्राने उपउपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.